झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/ १५८८/२०२१
दिनांक :०४/ १२/२०२१.

# "झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश"
## (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना )

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. १९/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे चिंचवड, स.नं.३१०/२व ३१०/१, सि.स.नं.४७५३, ४७५४ आणि ४७५५, येथील आण्णासाहेब मगरनगर, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ ६६००.०० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

आणि ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व एकूण ७०४७.०० चौ.मी. क्षेत्र महाराष्ट्र शासनाच्या दि.२१/०१/१९९१ रोजीच्या राजपत्रात पान.नं.२५१ मध्ये घोषित असलेने तसेच झोपटपट्टी निर्मुलन व पुनर्विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडील झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अहवाल प्राप्त असून मोजणी नकाशानुसार रस्त्यातंर्गत क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र ६६००.००चौ.मी. एवढ्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल असलेमुळे सदरचे एकूण ६६००.००चौ.मी. एवढे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र **'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २१-२७ ऑक्टोबर २०२१ पृष्ठ क्र. २२-२३ तसेच, दैनिक विश्वेश्वर व सांज महानगरी या वृत्तपत्रात दि.१४/१०/२०२१ व दि. १५/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि. २५/१०/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक पुर्वसूचनेद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले शासकिय विभाग यांना सदर क्षेत्राबाबत कळविणेत आले होते. त्यापैकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेमार्फत विनंती अर्ज प्राप्त झाले होते. सदर विनंती अर्जाला या कार्यालयाकडून उत्तर देणेत आलेले आहे.; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अहवालांच्या अवलोकनांती, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे

समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, म्हणून खात्री पटली आहे; आणि

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे **'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ येथे अपील दाखल करता येईल आणि तक्रार निवारण समितीचा अशा अपिलावरील निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**महानगरपालिकेचे नाव :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**झोपडपट्टीचे नाव :- स.नं.३१०/२व ३१०/१, सि.स.नं.४७५३, ४७५४ आणि ४७५५, आण्णासाहेब मगरनगर चिंचवड, पुणे**

| गाव | स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती नुसार) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| चिंचवड | स.नं.३१० /२व ३१०/१, सि.स.नं.४७५३, ४७५४ आणि ४७५५ | महाराष्ट्र शासन व औदयोगीक विकास महामंडळ | ६६००.०० चौ.मी. | **पुर्वेस** - लागू रस्ता<br>**पश्चिमेस** - पुणे मुंबई जुना रस्ता<br>**उत्तरेस** - सि.स.नं. ४७५५पै. व स.नं. २२५ पै क्षेत्र<br>**दक्षिणेस** - लागू सि.स.नं. ४७५६ पै. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

14.12.21

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-**१४ /१२ /२०२१

प्रत :-

१. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी) - यांना माहितीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.- यांना माहितीस्तव सादर.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.